राज्यामध्ये "युवा संसद" या
कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः युकयो-२०१९/प्र.क्र.२११/क्रीयुसे-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २४ जुलै, २०१९

**वाचा :-**

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. युकयो-२०१२/प्र.क्र.६७/क्रीयुसे-३, दिनांक ६ जानेवारी,२०१४.
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. युकयो-२०१२/प्र.क्र.६३/क्रीयुसे-३, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१३.
३. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. युकयो-२०१३/प्र.क्र.०८/क्रीयुसे-३, दिनांक २८ एप्रिल, २०१४.
४. समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्र. युकका-१०८९/७६२३/(२३)/क्रीयुसे-३, दिनांक २४ सप्टेंबर, १९९०
५. समाजकल्याण,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्र. पीएचई-११८९/७४३५/प्र.क्र.१४६/क्रीयुसे-३, दिनांक २८ डिसेंबर, १९८९
६. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. युकयो-१६१३/प्र.क्र.६६/क्रीयुसे-३, दिनांक १९ डिसेंबर, २०१३.
७. समाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो-२००२/प्र.क्र.१३२/क्रीयुसे-१, दिनांक २० जून, २००३.

**प्रस्तावना :-**

भारत देश हा युवांचा देश म्हणून ओळखला जातो, देशाच्या एकूण लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के लोकसंख्या ही युवांची असून राज्यातही युवा बहुसंख्येने आहेत. युवांना मानव संसाधन विकासामध्ये मुख्यस्त्रोत म्हणून महत्त्व असून विकास प्रक्रीयेमध्ये युवांची भूमिका महत्त्वाची आहे.

युवा हा समाजाचा अविभाज्य घटक असून विकास प्रक्रीयेतील आवश्यक व महत्वाचा भाग आहे. समाजातील युवांची संख्या पाहता त्यांच्यासाठी स्वतंत्र विचार करण्याची आवश्यकता आहे. वैश्विकरणाच्या युगात नवीन आव्हानांना तोंड देण्याकरीता युवांच्या सक्षमीकरणाची गरज आहे.

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विविध विषयात युवांनी पार पाडलेल्या भूमिका, दिलेले योगदान यामुळे युवांची एक अद्वितीय समूह अशी ओळख समाजात झालेली आहे. युवांना मानव संसाधन विकासाचा मुख्य स्त्रोत म्हणून देखील मान्यता देण्यात आलेली आहे.

युवांचे सक्षमीकरण म्हणजे या युवांच्या क्षमता, अधिकार व निर्णय प्रक्रीयेत समावेश करून त्यांचे आयुष्यासोबतचे इतर युवा प्रौढांचे आयुष्यात देखील बदल घडवून आणणे असा आहे. युवा सक्षमीकरण हे घरांमधून, शाळा-महाविद्यालयांमधून, युवा मंडळांच्या माध्यमातून, शासकीय धोरणांच्या माध्यमातून व समाजामार्फत विविध उपक्रमांचे आयोजनाद्वारे करता येणे शक्य आहे. सामाजिक निर्णय प्रक्रीया, संघटनात्मक नियोजन व शैक्षणिक सुधारणा हे युवा सक्षमीकरणाचे प्रमुख घटक आहेत.

या सर्व बाबींच्या अनुषंगाने राज्याचे युवा धोरण-२०१२ आखण्यात आले आहे. युवांच्या सक्षमीकरणाकरीता, विकासातील सहभागाकरीता, युवांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उत्साही, तणावमुक्त व जबाबदार आयुष्य जगण्याकरिता १) युवा महोत्सवाचे आयोजन, २) युवा प्रशिक्षण केंद्राची स्थापना, ३) नेतृत्व व्यक्तीमत्व विकास कार्यक्रमाचे आयोजन, ४) ग्रामीण क्षेत्रातील युवक कल्याण विस्तार, ५) सामुहिक सहभागासाठी विविध कार्यक्रम कार्यान्वित करणे, ६) राज्य युवा विकास निधीची स्थापना व ७) स्वयंसिध्दा महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी योजना तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर राबविण्यात येतात.

या कार्यक्रमांपैकी नेतृत्व व्यक्तीमत्व विकास कार्यक्रमातंर्गत युवा जागराच्या दृष्टीने चालू वर्षी प्रायोगिक तत्वावर प्रभावीपणे **'युवा संसद'** या नावाने कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेचे उद्दीष्ट राष्ट्र उभारणीकरीता युवा शक्तीचा विधायक हिस्सा वाढविण्यासाठी तसेच, युवांचे विचार व अपेक्षा जाणून घेऊन राष्ट्रीय व राज्य निर्माणामध्ये सामाजिक कार्यासाठी युवांना प्रोत्साहीत करून त्यांचेमधील नेतृत्व गुणांचा विकास, प्रगल्भपणे विचार करण्याची दृष्टी व नवसंकल्पना मांडण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे आहे. आतापर्यंत केंद्रीय स्तरावर युवा संसद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर राज्यामध्ये **'युवा संसद'** या कार्यक्रमाचे आयोजन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

प्रस्तावनेमधील विषद केलेली पार्श्वभूमी विचारात घेता, चालू वर्षामध्ये राज्यात नेतृत्व व्यक्तीमत्व विकास कार्यक्रमातंर्गत **'युवा संसद'** हा कार्यक्रम राबविण्यास शासन मंजूरी देत आहे. सदर कार्यक्रम राबविण्यासाठी खालीलप्रमाणे विस्तृत सूचना देण्यात येत आहेत :-

२. सामाजिक प्रश्नांबाबत युवांमध्ये जागरूकता असून त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना व त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे गरजेचे आहे. कालपरत्वे विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीमध्ये नवसंकल्पना मांडण्यासाठी मुक्त व्यासपीठ, विचार विनिमयाकरीता उपलब्ध असणे, तरुणाईचा शासकीय योजनांमध्ये सुधारणा सुचविणे, कार्यक्रम आखणीमध्ये त्यांच्या विचारांची दखल घेणे, युवामध्ये नेतृत्व गुणांचा विकास करणे एकंदरीतच राष्ट्रीय व राज्य विकास प्रक्रीयेत युवांना सामावून घेऊन महाराष्ट्र राज्यातील युवांच्या सर्वांगीण विकासाकरीता **'युवा संसद'** हा कार्यक्रम राज्यात राबविण्यात यावा. या कार्यक्रमाची टॅगलाईन **"युवा जागर - महाराष्ट्रावर बोलू काही"** अशी राहील.

युवा संसद या कार्यक्रमामध्ये सहभागासाठी मराठी माध्यम हे प्रमुख माध्यम राहील. मात्र काही कनिष्ठ महाविद्यालये जर इंग्रजी, हिंदी अथवा तत्सम माध्यमाची असतील तर अशा महाविद्यालयातील युवांना त्या त्या भाषेमध्ये आपले विचार मांडता येतील.

## ➢ उद्देश :-

१. राष्ट्रीय व राज्य निर्माणामध्ये युवांचा सहभाग वाढविणे.
२. युवांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास करणे.
३. सामाजिक कार्यासाठी युवांना प्रोत्साहीत करुन संधी उपलब्ध करुन देणे.
४. युवांचे विचार व अपेक्षा जाणून घेणे.
५. युवांच्या सुप्त गुणांना वाव देणे.
६. नवीन तंत्रज्ञानाचा स्पर्धेच्या युगात वापर करणे.

➢ **लाभार्थी** – १५ ते १९ या वयोगटातील कनिष्ठ महाविद्यालयातील युवा यामध्ये सहभागी होतील.

## ➢ कार्यान्वीत यंत्रणा –

- राष्ट्र उभारणीमध्ये युवा शक्तीचा विधायक सहभाग वाढविण्यासाठी **'युवा संसद'** या कार्यक्रमाचे आयोजन शिक्षण विभाग तसेच क्रीडा व युवक कल्याण विभाग यंत्रणेमार्फत करण्यात येईल.
- जिल्हास्तरावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना या कार्यक्रमासाठी नोडल ऑफिसर म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.
- या कार्यक्रमासाठी नेहरु युवा केंद्र संघटन यांचे तांत्रिक सहकार्य घेण्यात यावे.

## ➢ कनिष्ठ महाविद्यालय स्तर,तालुका स्तर,जिल्हा व राज्य युवा संसद स्तर व आयोजन पध्दत –

- राज्यातील सुमारे ९७०० कनिष्ठ महाविद्यालयांचा विचार करता कनिष्ठ महाविद्यालय स्तर प्रथम फेरी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात.
- कनिष्ठ महाविद्यालयांच्या २० कॉलेजचा १ गट याप्रमाणे ५०० गटामध्ये तालुकास्पर्धा घेण्यात यावी. ज्या तालुक्यात २० पेक्षा कमी कनिष्ठ महाविद्यालये असतील तेथे दोन/तीन तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयाचा गट तयार करावा. मात्र, अंतर जादा होत असेल तर ७ ते २० कॉलेजचा गट करण्याचा अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहील.
- तालुका/गट स्तरावरील स्पर्धेमधून प्रत्येक तालुका/ गटातील सर्वोत्कृष्ट ३ युवा जिल्हास्तरावर छात्र युवा संसदेत सहभागी होतील.
- जिल्हास्तरावरुन सर्वोत्कृष्ट ३ युवा हे राज्यस्तरावरील युवा संसदेत सहभागी होतील.

➢ **कॉलेजस्तर, तालुका/गट स्तर,जिल्हा व राज्यस्तरावर केंद्र व राज्य शासनाच्या खालील शासकीय योजनांवर विचार मांडण्यात यावेत.**

| **केंद्र व राज्य योजना** | |
|---|---|
| १.प्रधानमंत्री जनधन योजना, | ८. सेवा हमी कायदा, |
| २.स्वच्छ भारत अभियान, | ९. मुद्रा योजना, |
| ३.निर्मल ग्राम अभियान, | १०. पिक विमा योजना, |
| ४.श्रमदान | ११. मुख्यमंत्री/प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, |
| ५. प्रधानमंत्री उज्वला योजना, | १२. जलयुक्त शिवार अभियान, |
| ६. आयुष्यमान भारत, | १३. कौशल्य विकास कार्यक्रम, |
| ७. सर्वांसाठी घरे | १४. सुप्रशासन, |

**<u>गुणांकन</u>** - केंद्र व राज्य शासनाच्या वरील योजनांबाबत युवक/युवतींकडून मांडण्यात आलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे गुणांकन करण्यात यावे.

| अ.क्र. | बाब | गुण | |
|---|---|---|---|
| १. | विषयाचे सखोल ज्ञान | २० | अशा पाच बाबींसाठी प्रत्येकी २० गुण प्रमाणे एकूण १०० गुणांचे मुल्यांकन करण्यात यावे. |
| २. | मुद्दे मांडणी | २० | |
| ३. | वक्तृत्व कला | २० | |
| ४. | सादरीकरण | २० | |
| ५. | प्रभाव | २० | |
| | एकूण गुण | १०० | |

**(अ) कनिष्ठ महाविद्यालय स्तर - प्रथम फेरी**

(१) प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे.

(२) प्रत्येक युवक / युवतीस निश्चित केलेल्या विषयांवर विचार मांडण्यासाठी ४ ते ५ मिनिटे वेळ देण्यात यावा.

(३) प्रत्येक कॉलेज स्तरावर वक्तृत्व स्पर्धेमध्ये किमान ३० ते ५० युवांचा सहभाग असणे आवश्यक आहे.

(४) यामधून प्रथम, व्दितीय व तृतीय असे ३ क्रमांकाचे स्पर्धक पुढे तालुका/गट स्तरावर पाठविण्यात यावे.

(५) कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर वक्तृत्व स्पर्धेतील उत्कृष्ट युवक/युवतींची निवड करण्यासाठी कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयातील विषयतज्ञ / प्राध्यापक/सेवा निवृत्त प्राध्यापक यांची परिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

(६) स्थानिक स्तरावर सहकार्य घेऊन / प्रायोजक यांच्या सहकार्याने वक्तृत्व स्पर्धा पार पाडावी.

(७) कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर सहभागी होणाऱ्या युवांचा डाटाबेस तयार करणेसाठी नाव,इयत्ता,संपर्क क्र.,ई-मेल इ. माहिती संकलित करण्यात यावी.

(८) राज्यातील सुमारे ९७०० कनिष्ठ महाविद्यालयांचा विचार करता कनिष्ठ महाविद्यालय स्तर वक्तृत्व स्पर्धा प्रथम फेरी, २० कॉलेजचा १ गट याप्रमाणे अंदाजे ५०० गटामध्ये वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येईल.

(९) कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व युवांना सहभागाचे/गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात यावे.

**(ब) तालुका स्तर – द्वितीय फेरी**

(१) तालुका स्तरावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे.

(२) कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या प्रत्येक युवक / युवतीस ठरवून दिलेल्या विषयावर विचार मांडण्यासाठी ४ ते ५ मिनिटे वेळ राहील.

(३) आदिवासी, डोंगराळ-दुर्गम भागातील कॉलेजची संख्या कमी असल्याने ७ ते २० कॉलेजचा एक गट तयार करुन स्पर्धा घेण्यात यावी.

(४) कनिष्ठ महाविद्यालयांच्या २० कॉलेजचा १ गट याप्रमाणे ५०० गटामध्ये तालुकास्पर्धा घेण्यात यावी. ज्या तालुक्यात २० पेक्षा कमी कनिष्ठ महाविद्यालये असतील तेथे दोन/तीन

तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयाचा गट तयार करावा. मात्र, अंतर जादा होत असेल तर ७ ते २० कॉलेजचा गट करण्याचा अधिकार जिल्हास्तरीय समितीस राहील.

(५) ज्या तालुक्यात कनिष्ठ महाविद्यालयाची संख्या जास्त आहे. त्या तालुक्यात २० कॉलेजचा एक गट याप्रमाणे (६० स्पर्धकांचा एक गट ) वक्तृत्व स्पर्धा घेण्यात यावी. त्या गटास तालुक्याचे नाव व गट क्र.१/२/३... असे क्रमांक द्यावेत.

(६) प्रत्येक गटातील सर्वोत्कृष्ट ३ युवा जिल्हास्तरावर पाठविण्यात यावेत.

(७) कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व युवांना सहभागाचे/गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात यावे.

(८) तालुकास्तरावर सर्वोत्कृष्ट तीन युवांना प्रथम रु. ३,०००/-, द्वितीय रु. २,०००/- व तृतीय रु.१,०००/- याप्रमाणे बक्षिस रक्कम देण्यात यावी.

| तालुकास्तरीय आयोजन समिती | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **नाव** | **पदनाम** |
| १. | गट शिक्षणाधिकारी | अध्यक्ष |
| २. | मुख्याध्यापक/प्राचार्य (दोन प्रतिनिधी) | सदस्य सचिव |
| ३. | युवा विद्यार्थी प्रतिनिधी (१ युवक व १ युवती ) | सदस्य सचिव |
| ४. | तालुका क्रीडा अधिकारी | सदस्य सचिव |
| * आयोजनाच्या अनुषंगाने निमंत्रित सदस्य आमंत्रित करण्याचा अधिकार समिती अध्यक्षांना राहील. | | |

- तालुकास्तरीय आयोजन समितीकडे कनिष्ठ महाविद्यालय स्तर, तालुका/गट स्तर इत्यादी ठिकाणी वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याची जबाबदारी राहील. त्यांनी जिल्हास्तरीय समितीच्या निर्देशानुसार काम करावे. तालुका स्तरावर ३ परिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी. महाविद्यालयातील विषयतज्ञ शिक्षकांना परिक्षक म्हणून जबाबदारी सोपवावी.

**तालुका/गट स्तरीय स्पर्धा आयोजनाचा खर्च**

| अ.क्र. | बाब | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | ५०० ठिकाणी तालुकास्तरावरील सर्वोत्कृष्ठ तीन युवांना रोख पारितोषिक रक्कम प्रथम-रु.३,०००/-,व्दितीय-रु.२,०००/-, तृतीय - रु.१,०००/- या प्रमाणे (एकूण रु.६,०००/-) | रु.३०,००,०००/- |
| २. | ५०० ठिकाणी तालुकास्तरावरील आयोजन खर्च रु.१०,०००/-परिक्षक मानधन (प्रति परिक्षक रु.५००/- प्रमाणे ३ परिक्षक) प्रमाणपत्र, बॅनर,सन्मानचिन्ह, स्पिकर,फोटो, अहवाल तयार करणे, अल्पोपहार इ. | रु.५०,००,०००/- |
| | **एकूण** | **रु.८०,००,०००/-** |

**(क) जिल्हास्तर – तृतीय फेरी**

(१) जिल्हास्तरावर छात्र युवा संसदेचे आयोजन करण्यात यावे, कालावधी १ दिवसाचा राहील.

(२) युवा संसद ६ ते ७ तासाच्या कालावधीत सकाळ व दुपार अशा दोन सत्रात घेण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या आयोजनासाठी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करावे.

(३) तालुका/गट स्तरावरील प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाचे युवा हे जिल्हास्तरावर सहभागी होतील.

(४) जिल्हास्तरावर सहभागी होणाऱ्या युवांना सहभाग/गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात येईल.

(५) सर्वोत्कृष्ट तीन युवांना सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देवून गौरविण्यात यावे.

(६) जिल्हास्तरावर ३ सदस्यांची निवड समिती राहील. यामध्ये लेखक/शिक्षण क्षेत्रातील कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक/सेवा निवृत्त प्राध्यापक/राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी इत्यादींचा समावेश असावा.

(७) जिल्हास्तरावर सर्वोत्कृष्ट तीन युवांना अनुक्रमे प्रथम रु.१०,०००/-, व्दितीय- रु. ७,०००/-, तृतीय - रु.५,०००/- या प्रमाणे रक्कम रोख पारितोषिक म्हणून बक्षिस देण्यात यावी.

(८) छात्र युवा संसदेसाठी जिल्हयाचा संघ पाठविताना विद्यार्थ्यांसोबत तालुकास्तरावर एक जबाबदार व्यवस्थापक पाठविण्यात यावा.

**जिल्हास्तरावरील युवा संसद आयोजनासाठी खालीलप्रमाणे समिती राहील.**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | शिक्षणाधिकारी, (माध्यमिक ) | अध्यक्ष |
| २. | समन्वयक, नेहरु युवा केंद्र | सदस्य |
| ३. | युवा कल्याणकारी कार्य करणाऱ्या संस्था प्रतिनिधी एक | सदस्य |
| ४. | राष्ट्रीय/राज्य/जिल्हा युवा पुरस्कारार्थी एक प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | मुख्याध्यापक / प्राचार्य दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ६. | जिल्हा क्रीडा अधिकारी | सदस्य सचिव |

**(I) जिल्हा स्तरावर युवा संसद आयोजनासाठी खर्च**

| अ.क्र. | बाब | खर्च |
|---|---|---|
| १. | आयोजन खर्च ( हॉल भाडे , स्पिकर, बॅनर, उद्घाटन व समारोप समारंभ, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, फोटो, शुटींग, अहवाल तयार करणे इ. ) | रु. १८,०००/- |
| २. | ३ तज्ञांचे मानधन व भोजन व्यवस्था व प्रवास खर्च ( मानधन रु. १,०००/- व भोजन रु. २००/- ) | रु. ३,६००/- |
| ३. | बक्षिस रक्कम ( प्रथम रु.१०,०००/-, व्दितीय- रु. ७,०००/-, तृतीय - रु.५,०००/- ) | रु.२२,०००/- |
| | **एकूण** | **रु.४३,६००/-** |

**३६ जिल्हाकरीता रु.४३,६००/- प्रमाणे रु.१५,६९,६००/ इतका एकूण खर्च अपेक्षित आहे.**

**(II) जिल्हा स्तरावर युवा संसद आयोजनासाठी इतरेत्तर खर्च**

| अ.क्र. | बाब | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | जिल्हास्तर भोजन खर्च ५०० तालुक्यांमधील १५०० युवांचा सहभाग प्रति रु.१५०/- प्रमाणे १ दिवसासाठी | रु.२,२५,०००/- |
| २. | ५०० गटामधील प्रत्येकी ३ युवा याप्रमाणे १५०० युवांचा सहभाग प्रवास खर्च प्रति रु.१००/- प्रमाणे | रु.१,५०,०००/- |
| | **एकूण** | **रु.३,७५,०००/-** |

**एकूण जिल्हास्तरीय खर्च ( I ) + ( II ) रु.१५,६९,६००/- + रु.३,७५,०००/ = रु.१९,४४,६००/-**

**(ड) <u>राज्यस्तरीय युवा संसदेचे आयोजनाचे स्वरुप</u>**

(१) ३६ जिल्हयातून प्रत्येकी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या स्पर्धकांचा राज्यस्तरीय युवा संसदेत सहभाग राहील.

(२) राज्यस्तरीय युवा संसदेची रुपरेषा ही युवा संसद व युवा संमेलन या स्वरुपाची राहील.

(३) राज्यस्तरीय युवा संसद आयोजित होणाऱ्या स्थानिक शहरातील कनिष्ठ महाविद्यालयातील १००० युवक व युवती यांना युवा संमेलनासाठी प्रेक्षक म्हणून आमंत्रित करण्यात येईल. सदर नियोजन आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांचे स्तरावरील समितीने करावी.

(४) युवा संमेलनासाठी युवकांना ने-आण करणे, अल्पोपहार व दुपारचे भोजनासाठीचा खर्च विचारात घेण्यात यावा.

- **<u>कार्यक्रमाची दैनंदिन रुपरेषा</u>**

१. युवा संसदेसाठी सहभागी होणाऱ्या सदस्यांमधून व युवा संसद अध्यक्ष, युवा मंत्री मंडळाची निवड करण्यात यावी. तसेच विरोधी पक्षनेता व इतर सदस्य राहतील.

२. युवा संसदेचे सर्व कामकाज, कार्यवाही व नोंदी ठेवण्यासाठी ८ ते १२ अभ्यासू युवकांच्या सचिवालयाची निवड करण्यात यावी.

३. युवा संसदेमध्ये चर्चा ही निश्चीत केलेल्या शासकीय योजनांच्या अनुषंगाने असावी.

४. युवा संसदेमध्ये सामाजिक हिताचे विषय चर्चिले जाण्यासाठी नविन विषय युवा संसदेच्या सदस्यांना अध्यक्षत ठराविक वेळ निश्चित करून देतील त्यावेळेत सुचविता येतील. युवा संसदेमध्ये स्थानिक स्तरावरील विकासाच्या बाबी, अडीअडचणी यावर चर्चा करण्यात यावी.

५. सत्र १ - युवा संसद ही प्रथम सत्र व द्वितीय सत्र असे मिळून ६ ते ७ तासापेक्षा जास्त कालावधीसाठी असावी.

६. सत्राच्या सुरवातीला युवा संसदेचे अध्यक्ष सर्व सदस्यांना व सभागृहास युवा संसदेच्या कामकाजाचे मार्गदर्शन करतील. सदस्यांचा सामुहिक शपथविधी देतील, तसेच, प्रत्येक संसद सदस्यांना

बोलण्यासाठी किमान ३ मिनिटे कालावधी निश्चीत करावा. तसेच, चर्चेला संबंधित मंत्रीगण यांना उत्तर देण्यासाठी वेळ देतील.

७. सत्र २ - संसद अध्यक्षांच्या परवानगीने प्रश्नोत्तरे निश्चीत करुन क्रमाने सभा अध्यक्षांच्या पुढे ठेवण्यात यावे.

८. सदस्यांकडून महत्वाचे प्रश्न घेण्यात यावेत व त्याचा प्राधान्यक्रम ठरवून अध्यक्षाने चर्चिले जाणारे प्रश्न निश्चीत करावे.

९. प्रत्येक विभागाने आपले ठराव पारित करण्यासाठी प्रस्तावाची मांडणी करावी व प्रस्ताव मंजूर करुन घ्यावा.

**राज्यस्तर युवा संसद आयोजनासाठी खालीलप्रमाणे समिती राहील**

| **अ.क्र.** | **नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय | अध्यक्ष |
| २. | संचालक, शालेय शिक्षण , (माध्यमिक) | सदस्य |
| ३. | राज्य संचालक, नेहरु युवा केंद्र, राज्य कार्यालय प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | विद्यापीठ प्रतिनिधी | सदस्य |
| ५. | समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना | सदस्य |
| ६. | राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी | सदस्य |
| ७. | युवा कल्याणकारी कार्य करणाऱ्या संस्था प्रतिनिधी दोन | सदस्य |
| ८. | राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी दोन | सदस्य |
| ९. | उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा ( मुख्यालय ) | सदस्य सचिव |
| **समिती अध्यक्षांना युवा संसदेच्या अनुषंगाने सहकार्य करणाऱ्या घटकांना सदस्य म्हणून समितीवर नियुक्त करण्याचे अधिकार राहतील.** | | |

१०.जिल्हा युवा संसद आयोजन यशस्वीरित्या करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा, साधनसामुग्री, विद्युत व्यवस्था, पाणी, स्वच्छतागृह, ध्वनी प्रक्षेपण यंत्रणा इ. बाबी विचारात घेवून कार्यक्रमाआधी स्थळ, परिक्षक नियुक्त करणे इ. बाबी समितीद्वारे करण्यात याव्यात.

११.जिल्हा क्रीडा अधिकारी व समन्वयक नेहरु युवा केंद्र यांनी संपूर्ण विषयाची यादी व कार्यक्रमाची दैनंदिन संरचना तयार करावी.

१२.युवा संसदेची फलनिष्पत्ती व अहवाल तयार करुन तो संबंधित तालुका समितीकडे सादर करावा. युवा संसदेच्या सदस्यांना शासकीय योजनांची माहिती होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाच्या विविध विभागातील योजनांची आवश्यक माहिती उपलब्ध करून देण्यासाठी सर्व संबंधीत विभागानी सहकार्य करावे.

१३.तालुका व जिल्हा समिती सदस्य यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित राहून युवांना मार्गदर्शन करावे.

१४.सदर कार्यक्रमाची विविध माध्यमाद्वारे प्रसिध्दी करुन युवांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे.

१५.युवा संसदेमध्ये विशेष अतिथी म्हणून मा.मंत्री, मा. पालकमंत्री, मा. खासदार/ आमदार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), पोलिस अधीक्षक व इतर अधिकारी व तज्ञ यांना आमंत्रित करण्यात यावे.

१६.युवा संसदेमध्ये सहभागी होणाऱ्या युवांना जास्तीत जास्त चर्चेसाठी वेळ मिळणेसाठी उद्धाटन कार्यक्रम अल्प वेळेमध्ये संपन्न करावा.

**राज्यस्तर युवा संसद/<u>जिल्हास्तर छात्र युवा संसद आयोजन कार्यक्रम पत्रिका रुपरेषा खालील प्रमाणे असावी</u> :-**

<table>
<tr><th>वेळ</th><th colspan="2">बाब</th></tr>
<tr><td>सकाळ सत्र<br>०९.०० ते १०.०० वा.</td><td colspan="2">युवांची कार्यक्रम स्थळी उपस्थिती, नोंदणी व अल्पोपहार</td></tr>
<tr><td>१०.०० ते ११.०० वा</td><td colspan="2">छात्र युवा संसद उद्धाटन समारंभ व मान्यवरांचे मार्गदर्शन</td></tr>
<tr><td>११.०० ते ११.१५ वा</td><td colspan="2">चहापान</td></tr>
<tr><td rowspan="2">११.१५ ते १.३० वा.</td><td>युवा संसदेसाठी सहभागी होणाऱ्या सदस्यांमधून संसद अध्यक्ष, युवा मंत्रीमंडळ व विरोधी पक्षनेता यांची निवड करणे. तसेच, इतर संसद सदस्य राहतील.</td><td rowspan="2">• सत्राच्या सुरवातीला युवा संसदेचे अध्यक्ष सर्व सदस्यांना व सभागृहास युवा संसदेच्या कामकाजाचे मार्गदर्शन करतील.<br>• सदस्यांचा सामुहिक शपथविधी ,<br>• सदस्यांना बोलणेसाठी किमान ४ ते ५ मिनिटे कालावधी देण्यात यावा,<br>• चर्चेला संबंधित मंत्रीगण उत्तर देतील</td></tr>
<tr><td>शासकीय योजना, स्थानिक स्तरावरील विकासाच्या बाबी, अडचणी व उपाययोजना इ.च्या अनुषंगाने युवा संसदेमध्ये चर्चा</td></tr>
<tr><td>१.३० ते २.०० वा.</td><td colspan="2">दुपारचे जेवण</td></tr>
<tr><td>दुपार सत्र<br>२.०० ते ३.०० वा.</td><td>प्रश्नोत्तरे व ठराव</td><td>• संसद अध्यक्षांच्या परवानगीने प्रश्नोत्तरे निश्चीत करुन क्रमाने सभा अध्यक्षांपुढे ठेवणे,<br>• सदस्यांकडून महत्वाचे प्रश्न घेणे त्याचा प्राधान्यक्रम ठरविणे, अध्यक्षांनी चर्चिले जाणारे प्रश्न निश्चीत करणे</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | • विभागाने ठराव पारित करण्यासाठी प्रस्तावाची मांडणी व प्रस्ताव मंजूरी |
| ३.०० ते ४.०० वा. | समारोप | • युवा संसदेची फलनिष्पत्ती , अहवाल तयार करणे व समारोप |

## राज्यस्तरीय युवा संसद खर्चाचे अंदाजपत्रक

| अ.क्र. | बाब | खर्च |
|---|---|---|
| १. | निवास व भोजन व्यवस्था- ३६ जिल्हयांमधून प्रत्येकी ३ युवा व १ व्यवस्थापक याप्रमाणे एकूण १४४ व आयोजन अधिकारी ५० प्रती व्यक्ती रु. २५०/- प्रमाणे दोन दिवसासाठी) | रु. ९७,०००/- |
| २. | आयोजनखर्च ( स्टेज,एल.ई.डी,स्पिकर, बॅनर, उद्घाटन व समारोप समारंभ, सन्मानचिन्ह, फोटो, शुटींग, प्रशस्तीपत्रक, अहवाल तयार करणे इ.) | रु. ४,००,०००/- |
| ३. | ५ तज्ञांचे मानधन व भोजन व्यवस्था ( मानधन रु. १,५००/- व प्रवास व भोजन रु.१५००/-) संयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या व्यक्ती यांचे भोजन ( दोन दिवस ) | रु. ३०,०००/- |
| ४ | युवा संसदेतील सर्वोत्कृष्ट ३ युवा संसदपट्टुंना रोख पारितोषिक अनुक्रमे प्रथम रु.१.०० लक्ष, व्दितीय रु.०.७५ लक्ष , तृतीय रु.०.५० लक्ष देण्यात येईल. | रु.२,२५,०००/- |
| ५. | राज्यस्तर युवा संमेलन व युवा संसद सहभागी होणाऱ्या युवांची नोंदणी, ॲक्रेडेशन,टी शर्ट,फाईल,पॅड,पेन इ. ११०८ सदस्यांना प्रती ५०० प्रमाणे | रु.५,५४,०००/- |
| ६. | उपक्रम राबविणेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यासाठी राज्यस्तरावर १ दिवस कार्यशाळा खर्च सहभाग संख्या १०० | रु.२५,०००/- |
| ७. | सहभागी युवांचा प्रवास खर्च अंदाजे रु. २,००० X १४४ | २,८८,०००/- |
| | **(अ) एकूण** | **रु. १६,१९,०००/-** |
| ८. | युवा संमेलनासाठी- १००० युवकांसाठी दुपारचे भोजन व अल्पोपहार रु. २५०/- एकूण रु. २,५०,०००/-, युवकांचा वाहतुक खर्च रु.२,५०,०००/- | रु. ५,००,०००/- |
| ९. | युवा संसद व युवा संमेलन प्रसिध्दी | रु. १०,००,०००/- |
| | **(ब) एकूण** | **रु. १५,००,०००/-** |
| | **(अ) व (ब) एकूण** | **रु.३१,१९,०००/-** |

## युवा संसद आयोजन अपेक्षित कालावधी

| अ.क्र. | स्तर | कालावधी |
|---|---|---|
| १. | कॉलेज स्तरावरील वक्तृत्व स्पर्धा | १ ते ८ ऑगस्ट, २०१९ |
| २. | तालुका स्तरावरील वक्तृत्व स्पर्धा | ९ ते १५ ऑगस्ट, २०१९ |
| ३. | जिल्हास्तर युवा संसद | १६ ते २५ ऑगस्ट, २०१९ |
| ४. | राज्यस्तर युवा संसद | २६ ते ३० ऑगस्ट, २०१९ |

## युवा संसद आयोजन एकूण खर्च

| अ.क्र. | स्तर | खर्च |
|---|---|---|
| | **कनिष्ठ महाविद्यालय स्तर** | - |
| १. | ५०० तालुकास्तर वक्तृत्व स्पर्धा प्रति गटासाठी पारितोषिक रक्कम रु.६,०००/- व आयोजनासाठी रु.१०,०००/- असे एकूण रु.१६,०००/- | रु. ८०,००,०००/- |
| २. | जिल्हास्तर युवा संसद | रु. १९,४४,६००/- |
| ३. | राज्यस्तर युवा संसद | **रु. १६,१९,०००/-** |
| | **एकूण खर्च** | **रु. १,१५,६३,६००/-** |
| | **राज्यस्तर युवा संमेलन** | |
| ४. | १००० युवकांसाठी दुपारचे भोजन व अल्पोपहार रु. २५०/- एकूण रु. २,५०,०००/ (एक दिवस) तसेच, युवकांचा वाहतुक खर्च रु. २,५०,०००/- | रु. ५,००,०००/- |
| ५. | युवा संसद व युवा संमेलन प्रसिध्दीसाठी रु. १०,००,०००/- | रु. १०,००,०००/- |
| | **एकूण खर्च** | **रु.१,३०,६३,०००/-** |

३. उपरोक्त बाबींवरील होणारा रु.१३०.६३ लाख इतका खर्च आर्थिक वर्ष २०१९-२० करिता मागणी क्र.ई-३, (१०)(१३) नेतृत्व व्यक्तीमत्व विकास व अन्य कल्याणकारी कार्यक्रमाशी निगडीत बौध्दिक विकास करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन-युवा धोरणातंर्गत योजना (कार्यक्रम) (२२०४-५५९१) या लेखाशीर्षाखालील मंजूर व पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध केलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. उपरोक्त प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेला निधी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या सुपूर्द करण्यात येत असून त्यांना सदर निधी कोषागारातून आहरीत करण्यासाठी व जिल्हा क्रीडा अधिकारी/लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा यांना वितरीत करण्याकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे. या कार्यक्रमासंबंधीत तक्रार निवारण समिती आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या स्तरावरील समिती राहील व समितीवरील अधिकाऱ्यांना तक्रार निवारणाबाबतचे अधिकार राहतील.

५. उपरोक्त कार्यक्रमासाठी खर्च मंजूर करीत असतांना वित्त विभागाने दिलेल्या खरेदी प्रक्रीयेचे तसेच अस्तित्वात असलेल्या सूचनाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याकरीता नियंत्रक अधिकारी आणि आहरण व संवितरण अधिकारी यांनी जाणीवपूर्वक दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७२४१८०२०२११२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.07.25 15:25:47 +05'30'

**( राजेंद्र पवार )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय,मुंबई
३. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई
४. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई
५. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय,मुंबई
६. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व जिल्हाधिकारी,
१०.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११.सर्व पोलीस अधिक्षक,
१२. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४.संचालक, नेहरू युवा केंद्र, मुंबई
१५.सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१६.महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१७.महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
१८. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१९.संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी ( क्रीडा संचालनालयामार्फत)
२०.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
२१.वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई-३२.
२२.कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३.निवड नस्ती (क्रीयुसे-१,२, ३).